लातूर
भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले
सांज दैनिक : बुधवार – २ ऑगस्ट २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १२४
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : –9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◂ दर मंगळवारी ▸
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

संभाजी भिडेंविरोधात विधानसभेत विरोधक आक्रमक

मुंबई : महात्मा गांधीसंदर्भातील वादग्रस्त वक्तव्याविरोधात संभाजी भिडेंविरोधात सध्या राज्यभरात संतापाची लाट पाहायला मिळत आहे. संभाजी भिडेंच्या अटकेसाठी विधानसभेत विरोधक आक्रमक झाले आहेत. संभाजी भिडेंच्या वादग्रस्त वक्तव्यावरून विधानसभेत गदारोळ सुरू आहे. संभाजी भिडेंविरोधात विधानसभेत विरोधकांची जोरदार घोषणाबाजी सुरू आहे. सभागृहात भिडे यांना अटक करण्याची मागणी होत आहे. काँग्रेसचे नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी विधानसभेतच संभाजी भिडे यांच्या अटकेची मागणी केली आहे. तर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी तर भिडे यांना असेल तिथून उचलून अटक केली पाहिजे, अशी मागणी केली आहे.

संभाजी भिडे बोगस माणूस आहे. अनेक ठिकाणी जाऊन राज्यातील समाजसेवक आणि देव देवतांवर वादग्रस्त वक्तव्य केले आहे. तसेच खालच्या पातळीवर जाऊन टीका करतो आणि हा माणूस मोकाट फिरत आहे. भिडे मुक्तपणे वावरत आहे त्याला पोलीस संरक्षण दिले गेलंय. ज्या अर्थी सरकार कुठलीही कारवाई करत नाही त्यामागे पोलिसांचे संरक्षण त्याला मिळालेलं आहे. या माणसाला एवढं संरक्षण कसे मिळते निवडणुकीला फायदा करून घेण्यासाठी हे उदयोग सुरू नाहीत ना? असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी सभागृहात उपस्थित केला. पृथ्वीराज चव्हाणांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले. भिडे यांना कोणतीही सुरक्षा पुरवली नसल्याचे फडणवीस म्हणाले.

राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड म्हणाले, भिडेंबद्दल आज चर्चा झाली, पण जास्त झाली नाही. महात्मा गांधी, महात्मा फुले यांच्याविषयी अनेक वादग्रस्त वक्तव्य केली.पंडित नेहरू यांचा काही योगदान देशासाठी नव्हतं त्यांचा कुटुंब मुसलमान होत असे भिडे म्हणाले. एवढच नाही तर १५ ऑगस्ट हा भारताचा स्वतंत्र दिन नाही असेही ते म्हणाले. अशी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीला हे सगळयात मोठे समाजसुधारक म्हणतात. वादग्रस्त वक्तव्यांनंतर देखील अटक होत नाही. संभाजी भिडेला राजाश्रय मिळाला आहे. महाराष्ट्र हातातून जात असताना दंगली घडाव्यात अशी त्यांची इच्छा असावी म्हणून त्यांना पाठीशी घातलं जात असेल. भिंडेची स्वतः ठाण्याला तक्रार केली आहे.

संभाजी भिंडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याची मालिका काही थांबता थांबत नाही. आधी १५ ऑगस्ट हा खरा स्वातंत्र्यदिन नाही, त्यानंतर आता महात्मा गांधी यांचे वडील मुस्लीम होते, असे वादग्रस्त वक्तव्य संभाजी भिडे यांनी केले. या प्रकारानंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी संताप व्यक्त करून संभाजी भिडे यांच्या विरुद्ध आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील काही पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करून गुन्हे दाखल झाले आहेत.

राज्यात पाऊस पुन्हा बरसणार

मुंबई : राज्यात उशिराने दाखल झालेला मान्सून जोरदार बरसला. पण ऑगस्टच्या पहिल्या दोन दिवसात मात्र पावसाचा जोर कमी झाल्याचं पाहायला मिळालं. पण अशात आज पुन्हा एकदा पावसानं हजेरी लावली आहे. राज्यातल्या अनेक भागांमध्ये आज येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडेल अशी शक्यता हवामान खात्याकडून आहे. दरम्यान, उर्वरित महाराष्ट्रात मात्र हवामान कोरडे असेल किंवा पावसाची रिमझिम पाहायला मिळेल. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर धारावीमध्ये हलका पाऊस पडेल तर विदर्भात पावसाने चांगलीच उघडीत दिल्याचे पाहायला मिळते.

बुधवारपासून तीन ते चार दिवस राज्यात मुसळधार पाऊस पडू शकतो. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील पावसावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, अशी माहिती भारतीय हवामान विभागातर्फे मंगळवारी देण्यात आली.

बुधवारपासून राज्यात पाऊस पुन्हा एकदा सक्रिय होत असून रायगड, रत्नागिरीला बुधवार, गुरुवारसाठी ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे. रायगड आणि रत्नागिरीत या दोन दिवसांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. सिंधुदुर्गात मात्र गुरुवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईमध्येही बुधवार आणि गुरुवार हे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून गुरुवारी पालघर आणि ठाणे जिल्ह्यालाही ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यात शुक्रवारीही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल.

सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाईंची आत्महत्या, कारण अद्याप अस्पष्ट

मुंबई : सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांनी आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. त्यांच्या कर्जत येथेली एन. डी. स्टुडिओमध्ये त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. नितीन देसाई यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक हिंदी, मराठी चित्रपटांमध्ये, इतिहासकालीन मालिकांमध्ये कला दिग्दर्शनाचं काम केलं. त्यांच्या आत्महत्येमुळे चित्रपटसृष्टीतून शोक व्यक्त करण्यात येत आहे. ते ५८ वर्षांचे होते.

नितीन देसाई यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून आपलं प्रशिक्षण पूर्ण केलं होतं. १९८७ सालापासून त्यांनी चित्रपटांसाठी कला दिग्दर्शनाचं काम सुरू केलं. २००५ साली त्यांनी कर्जतमध्ये त्यांचा एन. डी. स्टुडिओ उभा केला. याच स्टुडिओमध्ये त्यांनी आत्महत्या केल्याची बाब समोर आली आहे.



त्यामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

नितीन देसाई यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मराठी, हिंदी चित्रपटांसाठी कला दिग्दर्शनाचं काम केलं. यामध्ये जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, माचिस, देवदास, लगान, प्रेम रतन धन पायो अशा अनेक हिट चित्रपटांचा समावेश आहे. यासारख्या अनेक चित्रपटांसाठी नितीन देसाईंनी 'लार्जर दॅन लाईफ' असं चित्र उभं करण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. अनेक ऐतिहासिक मालिका व महानाट्यांसाठीही नितीन देसाई यांनी उभारलेले सेट प्रचंड चर्चेचा विषय ठरले होते.

डेंग्यु विषयी शालेय जनजागृती अभियान

लातूर : डेंग्यू उपाचारासाठी कारणीभूत असणाऱ्या एडिस एजिप्ती डासाची उत्पत्ती साचलेल्या पाण्यात होत असते याबाबत तसेच डास उत्पत्तीच्या आवस्था डासअळी कशी दिसते वैयक्तीक दक्षता याबाबत विदयार्थ्यांना आरोग्य शिक्षण देण्यासाठी व डासअळी प्रत्यक्षात दाखवण्यासाठी शाळेत जाऊन विदयार्थ्यांना माहिती देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विशेष अभियान दिनांक १७ जुलै पासून राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महानगरपालिकेचे एमपीडब्ल्यु, एएनएम व आशा स्वयंसेविका हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळेमध्ये सकाळी प्रार्थनेच्या वेळी जाऊन विदयार्थ्यांना डासअळी प्रत्यक्षात दाखवून त्यांना डेंग्यू आजार व वैयक्तीक घ्यावयाची दक्षता याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.या अंतर्गत आत्तापर्यंत यशवंत शाळा, केशवराज शाळा, प्रतिभा निकेतन शाळा, बसवणप्पा वाले इंग्लीश स्कुल, शिवाजी शाळा, गोदावरी शाळा, व्यंकटेश शाळा इ. ४० विवीध शाळांमधून विदयार्थ्यांना माहिती देण्यात आली आहे.

तसेच विद्यार्थ्यांना याबाबत पालकांना माहिती देवून त्यांच्या स्वत:च्या घरी डास उत्पत्ती होणार नाही याची पालकासोबत पाहणी करणे बाबत व तसेच पुर्ण बाहयांचे कपडे वापरणे बाबत आवाहन करण्यात येत आहे. सदरील अभियान सर्व प्रमुख शाळांमधून राबविण्यात येणार आहे.

अंत्यविधीसाठी बाहेरगावी गेलेल्या कुटुंबियांच्या घरी चोरी

निलंगा : निलंगा शहरातील लोंढे नगर भागात राहणारे एक कुटुंब नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठी म्हणून घर बंद करून बाहेरगावी गेले होते. सुमारे १२-१३ दिवसानंतर हे कुटुंब घरी आल्यानंतर घराचा कडी-कोंडा तोडून चोरट्यांनी घरातील रोख रक्कम व दागिने चोरून नेल्याचा प्रकार घडला आहे.

किशन विष्णुदास अटल हे लोंढे नगरातील लोंढे यांच्या घरात राहत होते. नातेवाईक वारल्याने त्यांच्या अंत्यविधीसाठी म्हणून हे कुटुंब १७ जुलै रोजी बाहेर जिल्ह्यात गेले होते. ते १ ऑगस्ट रोजी परत आले तेंव्हा त्यांना त्यांच्या घराचा कडी-कोंडा तोडून चोरटट्याने घरामध्ये प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्याचे टॉप, अंगठ्या, इंग्लीश चेन, चांदीचे देव, छत्री, नाणी, चेन असा एकूण २६ हजार २८६ रूपयांचा ऐवज चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी निलंगा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बनावट चावीने शटर खोलून दुकानातून चोरी

देवणी : देवणी येथील गुरनाळे टेन्ट हाऊस या दुकानाच्या शटरची बनावट चावीने कुलूप काढून दुकानातील सुमारे ४० हजार रूपये किंमतीच्या साहित्याची चोरी करण्यात आली आहे. मारोती किशनराव गुरनाळे रा. हंचनाळ, ता. देवणी यांचे देवणी येथे दुकान आहे. या दुकानाचे शटर बनावट चावीने खोलून दुकानातील ॲम्प्लीफायर व इतर साहित्य एकूण किंमत ४० हजार रूपये चोरट्यांनी चोरून नेले आहे. या प्रकरणी देवणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किनगावात दिवसा घरफोडी १.८२ लाखांच्या ऐवजाची चोरी

किनगाव : किनगाव येथील ठाकरे नगर भागात राहणारे एका कुटुंबाच्या घरात चोरट्यांनी दिवसा घरफोडी करून १ लाख ८२ हजार ७१० रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. शिवाजी बाबजी गुट्टे (वय ७० वर्षे) हे ठाकरे नगर किनगाव येथे राहतात. ३१ जुलै रोजी सकाळी साडेदहा ते साडेबारा वाजण्याच्या सुमारास दिवसा चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून घरातील सोन्याचे झुमके, अंगठ्या, मणीमंगळसूत्र, सोन्याची माळ, रोख ५७ हजार रूपये असा एकूण १ लाख ८२ हजार ७१० रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी किनगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महसूल दिन सप्ताह अंतर्गत 'सैनिक हो तुमच्यासाठी' कार्यक्रम

लातूर : जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, शहीद जवानाच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित यांच्या अडचणी सोडविण्यासाठी महसूल विभागामार्फत ५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता संबंधित तहसील कार्यालयात 'सैनिक हो तुमच्यासाठी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी सैनिकाच्या अडीअडचणी दूर करणे, त्यानां लागणारी प्रमाणपत्रे, दाखले व इतर लाभ महसूल विभागामार्फत देण्याची कार्यवाही यावेळी केली जाणार आहे. तरी या उपक्रमास आजी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, शहीद जवानाच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित अर्जदारांनी स्वत: उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी केले आहे.

'माझी माती, माझा देश' या अभियानात भाग घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडून नागरिकांना आवाहन

आजादी का अमृत महोत्सव
मेरी माटी मेरा देश
जिला परिषद लातूर
Scan me!

लातूर : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगतेनिमित्त देशभरात अमृत कलश यात्रा काढण्यात येणार आहे. ही यात्रा देशाच्या कानाकोपऱ्यातून ७५०० कलशांमध्ये माती घेऊन दिल्लीत पोहोचेल. देशाच्या विविध भागांतून रोपेही आणली जाणार आहेत. राष्ट्रीय युद्धस्मारकाजवळ कलशातील माती आणि झाडे टाकून 'अमृत उद्यान' बांधण्यात येईल. हे अमृत उद्यान 'एक भारत श्रेष्ठ भारत' चे भव्य प्रतीक बनेल. यासाठी जिल्हा परिषदेकडून एक मोबाईल अँप तयार करण्यात आले आहे. यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले आहे. त्यासाठी खालील लिंक दिली आहे.

माझी माती, माझा देश उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी लातूर जिल्ह्यातील रहिवाशांसाठी विशेष वेबसाईट merimatimeradeshlatur.in ह्या संकेतस्थळावर आपला मातीसोबत सेल्फी अपलोड करा व १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी ह्याच संकेतस्थळावरुन इ-प्रमाणपत्र प्राप्त (डाउनलोड) करा. सोबत दिलेला क्यू आर कोड स्कॅन करा किंवा वर दिलेल्या लिंकवर क्लिक करा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक,जिल्हा परिषद, लातूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी

लातूर : जिल्हा पोलीस दलात स्थानिक गुन्हे शाखा साईड ब्रांच असली तरी महत्त्वाची शाखा मानली जाते. लातूर जिल्हा स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक भातलवंडे यांच्या बदलीचा आदेश यापूर्वीच आला आहे.

काही दिवसापासून या पदावर येण्यासाठी अनेक प्रयत्न केले असले तरी पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी बाजी मारली असून त्यांची लातूर स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणून बदली झाली आहे. संजीवन मिरकले हे बोरी तालुका लातूर येथील रहिवासी आहेत.एलसीबीत बदली होण्याआधी ते शिवाजीनगर पोलीस ठाणे लातूर येथे कार्यरत होते. त्या अगोदर ते एमआयडीसी पोलीस ठाणे लातूर येथे होते.

लातूर स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांचा येथिल कार्यकाल पूर्ण झाल्याने काही दिवसापूर्वीच पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगाव येथे बदली आदेश आला आहे. लातूर एलसीबी चे या पदावर जिल्ह्यातील काही पोलीस निरीक्षकांचा डोळा होता. या जागेसाठी काहींनी सर्व प्रयत्न केले.

पण यात पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी बाजी मारली आहे. मिरकले यांच्या बदलीने रिक्त झालेल्या शिवाजीनगर पोलीस ठाणे येथील जागेवर नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांची बदली करण्यात आली आहे.

त्यांच्या मते....

▣ **माझ्या कार्यक्रमात नेहमीच गोंधळ होणार असेल तर मी इथून पुढे कार्यक्रम बंद करेन.**
–गौतमी पाटील

असे झाले तर तरुण ढसाढसा रडतील आणि ताण कमी झाल्याने पोलीस आनंदी होतील.

▣ **शरद पवार साहेब आणि मी तेव्हाही वेगळे नव्हतो आजही वेगळे नाहीत.**
–अजित पवार

जनतेलाही असेच वाटते.

▣ **नागरिकांची तक्रार कागद म्हणून न वाचता मानवी दृष्टीकोन ठेवून त्यांची समस्या सोडवावी.**
– जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे

प्रशासनातील भगिनींचा दृष्टिकोन दिलासादायक.

▣ **काँग्रेस नेते अशोक चव्हाण आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात विधानभवनातील दालनात प्रदीर्घ चर्चा झाली.**
–एक बातमी

एका राज्यातील उपमुख्यमंत्री अशी दुसरी बातमी येऊ नये.

डोळ्यांच्या साथीबाबत नागरिकांनी काळजी घ्यावी

लातूर : राज्यातील बऱ्याच भागामध्ये मागील १०-१५ दिवसांपासून डोळे येण्याची (Conjunctivitis) साथ चालू आहे. शहरामध्ये देखील तुरळक प्रमाणात असे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामूळे नागरिकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. तरी नागरिकांच्या माहितीसाठी खालील प्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

पावसाळ्यामध्ये हवेतील अद्रता वाढून प्रामुख्याने ॲडीनो व्हायरसमुळे डोळे येणे (Conjunctivitis) या आजाराची लागण होत असते. डोळे येणे हा संसर्गजन्य आजार आहे याचे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमण होते. औषधोपचाराने डोळे ४-५ दिवसात बरे होतात तरीदेखील नागरिकांनी आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे.

डोळ्यातून सतत पाणी येणे, डोळे लाल होणे, डोळ्यांना सूज

येणे, डोळ्यातून पिवळसर चिकट द्रव वाहने, डोळ्यात खाज येणे, डोळे चिकटने, प्रकाशाचा त्रास होणे इ.

डोळे आल्यास शक्यतो घराबाहेर पडू नये. डोळे आलेल्या व्यक्तीने घराबाहेर पडताना काळा चष्मा वापरावा. आपला रुमाल, चष्मा, आयड्रॉप्स, टॉवेल इ. वस्तू इतरांना वापरण्यास देवू नये. डोळ्यांना सतत हात लावू नये. हात लावल्यावर हात स्वच्छ धुवावेत. नेत्रचिकित्सक यांचेकडून तपासणी करून घ्यावी व डॉक्टरांच्या सल्ल्यानूसार उपचार घ्यावेत. लहान मुलांना याची लागण झाल्यास पालकांनी अश्या मुलांना आजार बरा होईपर्यंत शाळेत पाठवू नये. शाळेतील शिक्षकांनी देखील याबाबत विद्यार्थ्यांना डोळे आल्यास आजारातून बरा होईपर्यंत शाळेत न येणेबाबत सूचना द्यावी. निवासी शाळा / वसतीगृह अशा ठिकाणी डोळे आलेल्या मुलाला / मुलीला किंवा व्यक्तीस वेगळे ठेवण्यात यावे, जेणेकरून त्याचा प्रसार इतर विद्यार्थ्यांमध्ये होणार नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात स्तनपान सप्ताह साजरा

लातूर : लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ऑगस्ट महिन्यातील पहिला सप्ताह हा जागतीक स्तनपान सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला.

स्तनपानाचे संरक्षण ही सामूहिक बांधिलकी हे यावर्षीचे घोषवाक्य असून सामूहिक बांधिलकी या नात्याने ०१-०८-२०२३ रोजी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागातर्फे आणि LOGS च्या वतीने जागतिक स्तनपान सप्ताह उत्सव आयोजित करण्यात आला होता. यासोबतच परिचारिकारांचा रुग्णसेवेतील योगदान बद्दल सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांनी केले. यावेळी स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख, डॉ. भाऊराव यादव, डॉ. मेघना गुगळे, डॉ. ज्योती सुळ, डॉ. प्रतिमा कुलकर्णी, डॉ. शिवप्रसाद मुंदडा, डॉ. मुशीर शेख यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात बीबीसी प्रसारित स्तनपानाची माहिती देणारा चित्रफित दाखवून केली. याद्वारे स्तनपान साठी योग्य ती शरीरावस्था, आईला व बाळाला होणारे फायदे स्तनपानाच्या वेळा या सर्व गोष्टींची माहिती देण्यात आली.

तसेच जागतिक स्तनपान सप्ताह यानिमित्ताने पोस्टर्स तयार करण्यात आले होते. त्यांचे उद्घाटन डॉ. मेघना गुगळे व डॉ. ज्योती सुळ यांच्या हस्ते करण्यात आले. हे पोस्टर्स रुग्णालयातील कक्षात लावण्यात येतील व दररोज स्तनपानाचे महत्त्व मातांना समजवण्यात येतील अशी हमी विभाग प्रमुख डॉ. वर्षा देशमुख यांनी दिली.

या कार्यक्रमात LOGS चा मोलाचा वाटा होता. LOGS च्या मुख्य सचिव डॉ. मेघना गुगळे व सचिव डॉ. ज्योती सुळ यांच्या हस्ते रुग्णालयातील सर्व मातांना उच्च प्रथिने आहार देण्यात आला. या आहारामध्ये दूध व चिक्की यांचा समावेश असून हा आहार सात दिवसांकरता वाटप करण्यात येणार आहे. LOGS च्या वतीने स्तनपानाचे महत्त्व सांगणारी माहितीपत्रिकेचे वाटप करण्यात येणार आहे.

तसेच अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांच्या हस्ते रुग्णसेवेतील योगदानाबद्दल परिचारिकांचे प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या सत्काराने प्रोत्साहित होऊन परिचारिकांनी देखील दररोज कक्षामध्ये स्तनपान समुपदेशन करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रुती गावडे व डॉ. सुरभी पांडे यांनी केले असून आभार डॉ. पूजा क्षीरसागर यांनी मानले.

टोमॅटो विकून शेतकऱ्याने फेडले दीड कोटीचे कर्ज, कमाई ऐकून व्हाल थक्क

या महागाईने जिथे सर्वसामान्य जनता हैराण झाली आहे, तिथे हिरव्या भाज्यांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना लॉटरी लागली आहे. हिरवा भाजीपाला विकून अनेक शेतकरी श्रीमंत झाले आहेत. विशेषत: टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न या महागाईत अनेक पटींनी वाढले आहे. देशातील अनेक शेतकरी टोमॅटो विकून करोडपती झाले आहेत. ४८ वर्षीय शेतकरी मुरली या शेतकऱ्यांपैकी एक आहे. मुरलीने अवघ्या काही दिवसांत टोमॅटो विकून ४ कोटी रुपये कमावले. त्यामुळे मुरली संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी मुरली हा आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. अनेक दिवसांपासून ते त्यांच्या

गावात टोमॅटोची लागवड करत आहेत. पण याआधी त्याला कधीच इतका फायदा झाला नव्हता. गेल्या वर्षी भावात घसरण झाल्याने त्यांना दीड कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. सावकाराकडून कर्ज घेऊन शेती केली. अशा स्थितीत ते दीड कोटी रुपयांचे कर्जदार झाले होते. मात्र यंदा तो टोमॅटो विकून श्रीमंत झाला. चढ्या भावामुळे त्यांनी अवघ्या काही दिवसांत टोमॅटो विकून चार कोटी रुपये कमावले.

विशेष म्हणजे एवढी मोठी रक्कम मिळवण्यासाठी मुरलीलाही खूप मेहनत करावी लागली. टोमॅटो विकण्यासाठी त्यांना दररोज १३० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर कापावे लागत होते. त्याला चांगला भाव मिळावा म्हणून तो कोलार येथे टोमॅटो विकण्यासाठी जात असे. विशेष बाब म्हणजे दीड कोटी रुपयांचे कर्ज फेडल्यानंतर मुरली अवघ्या ४५ दिवसांत २ कोटी रुपये कमवू शकला.

या नफ्याने मुरली खूप खूश आहे. आता अधिक क्षेत्रात टोमॅटोची लागवड करण्याचा त्यांचा विचार आहे. आता त्याला शास्त्रोक्त तंत्राचा अवलंब करून बागायती पद्धतीने टोमॅटोची लागवड करायची आहे, जेणेकरून चांगले उत्पादन मिळेल. विशेष म्हणजे अधिक क्षेत्रात शेती करण्यासाठी मुरली गावातच अधिक जमीन खरेदी करण्याचा विचार करत आहे.

याआधी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील ईश्वर गायकर या शेतकऱ्याने टोमॅटो विकून २.८ कोटी रुपये कमावले होते. ईश्वर गायकर हे देखील गेल्या ७ वर्षांपासून १२ एकरात टोमॅटोची लागवड करत आहेत. पण त्याने एवढी कमाई कधीच केली नव्हती. याआधी त्यांना अनेकवेळा टोमॅटोच्या लागवडीत मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले होते. २०२१ मध्ये टोमॅटोच्या लागवडीत ईश्वर गायकर यांचे १८-२० लाख रुपयांचे नुकसान झाले.

तुमच्या नावावर इतरांना सिम कार्ड दिल्यास याल गोत्यात, ताबडतोब बंद करा नंबर



अनेक वेळा लोक त्यांच्या आयडीमधून एकापेक्षा जास्त मोबाईल नंबर घेतात आणि ते एखाद्या गरजू किंवा त्यांच्या मित्राला वापरण्यासाठी देतात. पण तुम्हाला माहीत आहे का की तुमची ही मदत तुम्हाला अडचणीत आणू शकते, तुम्ही कर्जबाजारी किंवा गोत्यातही येऊ शकता. आता तुम्ही विचार करत असाल की कोणाला मदत करायला काय हरकत आहे? खरं तर, नुकत्याच आलेल्या एका अहवालानुसार, एका व्यक्तीला आपल्या मित्राला मदत करणे महाग पडले आहे. येथे आम्ही तुम्हाला हे संपूर्ण प्रकरण काय आहे आणि जर तुमच्यासोबत असे घडले तर तुम्ही ते कसे टाळू शकता ते सांगणार आहोत.

एका व्यक्तीकडे दोन सिम कार्ड होते, म्हणून त्याने एक त्याच्या मित्राला दिले. त्या मित्राने त्या व्यक्तीचे सिम वापरण्यास सुरुवात केली, काही काळानंतर त्या व्यक्तीने आपले घर बदलले आणि दुसऱ्या ठिकाणी राहू लागला. काही दिवसांनी त्याला त्याचा दुसरा नंबर हवा होता म्हणून त्याने मित्राला कॉल करण्याचा प्रयत्न केला, पण समोरून काहीच उत्तर आले नाही, अशा परिस्थितीत त्या व्यक्तीला वाटले की तो हा नंबर पुन्हा चालू करेल, पण इथे कथेला वळण मिळाले.

नंबर सुरू झाल्यानंतर, त्या व्यक्तीला कर्जाची परतफेड करण्यासाठी बँकेकडून फोन येऊ लागतात. आता तुम्हाला समजले असेल, पण आम्ही तुम्हाला सांगतो की ज्या मित्राला सिम देण्यात आले होते, त्याने त्या व्यक्तीचा नंबर देऊन बँकेकडून कर्ज घेतले होते, त्यानंतर त्याला त्या व्यक्तीची परतफेड करावी लागू शकते.

एखाद्याला सिम कार्ड देण्यापूर्वी या गोष्टीकडे लक्ष द्या

जर तुम्ही तुमच्या आयडीवरून घेतलेले सिम दुसऱ्या व्यक्तीला दिले आणि त्या व्यक्तीने तुमच्या सिमसोबत काही गैरप्रकार केले, तर तुमच्यावर पोलिस कारवाई होऊ शकते. कारण ज्या व्यक्तीच्या नावावर सिम आहे, तोही दोषींच्या यादीत येतो, त्याने काहीही केले नसले तरी.

असे ब्लॉक करा सिम कार्ड

यासाठी प्रथम https://tafcop.dgtelecom.gov.in/alert.php) या पोर्टलवर लॉग इन करा. यानंतर, त्यामध्ये तुमचा मोबाइल क्रमांक भरा आणि जो जढझ आला आहे, तो पोर्टलवर भरा. येथे तुम्हाला सक्रिय कनेक्शनची माहिती दिसेल, म्हणजे तुमच्या आयडीवरून घेतलेल्या सर्व सिमचा डेटा दाखवला जाईल. येथे तुम्हाला यूजर नंबर ब्लॉक करण्यासाठी रिक्वेस्ट पाठवण्याचा पर्याय मिळेल, त्यात रिक्वेस्ट पाठवा. विनंती केल्यानंतर, तुम्हाला एक तिकीट आयडी पाठवला जाईल, ज्यामुळे तुम्ही तुमच्या पाठवलेल्या विनंतीचा मागोवा घेऊ शकाल. या चरणांनंतर, हा क्रमांक काही आठवड्यांत बंद होतो.

अशा परिस्थितीत काय करावे

सर्व प्रथम, वर नमूद केलेले सिम बंद करण्याची प्रक्रिया पूर्ण करा, त्यानंतर परिसरातील स्थानिक पोलिस ठाण्यात जा आणि प्रकरणाची संपूर्ण माहिती द्या आणि एफआयआर नोंदवा. जेणेकरून एखाद्या व्यक्तीने तुमच्या सिममध्ये काही चुकीचे केले, तर त्याचा तुमच्यावर परिणाम होणार नाही. त्यानंतर संपूर्ण प्रकरण बँकेला शांतपणे समजावून सांगा.

सांस्कृतिक अस्मिता आणि महाराष्ट्र!

महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास महाराष्ट्रीय संस्कृतीची जडणघडण भक्ती पंथामुळे झाली. महाराष्ट्र संस्कृतीचा प्रारंभ काळ म्हणून या कालखंडाचा अनेकांनी गौरव केला आहे. न्यायमूर्ती रानडे, गं. भा. सरदार प्रभूतींनी यासंदर्भात मूलगामी विवेचन केले आहे. मराठी भाषा आणि महाराष्ट्र राज्याबद्दलची पहिली अस्मिता संत साहित्यातून अभिव्यक्त झाली. याबाबत संत ज्ञानेश्वर आणि महानुभाव पंथाला याचे श्रेय द्यावे लागते. देशी भाषा आणि तिचा गौरव या साहित्यातून आविष्कृत झाला. महाराष्ट्र भाषेचे, संस्कृतीचे गुणगान गाण्याचे आणि तिची महती व्यक्त करण्याची परंपरा श्री चक्रधर ज्ञानेश्वर यांच्यापासून ते मुक्तेश्वर रामदासांपर्यंत अविच्छन्नपणे सुरू होती. शिवकाळात स्वराज्याच्या स्थापनेसाठी या महाराष्ट्रीय अस्मितेची श्रद्धायुक्त जाणीव खूपच सहाय्यभूत ठरली.

राष्ट्रीय एकात्मता हा आधुनिक काळातील परवलीचा शब्द आहे. एकात्म जाणिवेच्या प्रत्ययासाठी आज सर्वच आघाड्यांवर जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. भारतासारखे सर्वच बाबतीत बहुआयामी असणारे राष्ट्र हे जागतिक स्तरावर अनेक बाबतीत जसा कुतूहलाचा विषय आहे, तसाच तो विस्मयाचाही विषय आहे. निसर्गत: जी वैविध्यपूर्णता भारतास लाभली, येथील बदलणारे वातावरण, ऋतुचक्र हे माणसाच्या जीवन विकासासाठी अत्यंत पोषक आहे. या नैसर्गिक समृद्धीचा अनेकांना हेवा वाटतो.

ही वैविध्यपूर्णता आपले बलस्थान आहे, परंतु या विविधतेप्रमाणेच भाषा, जातपात, धर्म, रूढी, परंपरा याबाबतही भारतातील अनेक प्रांतांत विविधता दिसून येते. अशा या भारताच्या सर्वांग सुंदर वैविध्यपूर्णतेला एकाच सांस्कृतिक धाग्यात बांधून ठेवण्याचे अतुलनीय कार्य भारतातील मध्ययुगीन कालखंडातील संत परंपरेने केले. स्वहित, स्वनिष्ठा याबरोबरच राष्ट्रहित आणि राष्ट्रीय एकात्मतेचे संस्कारही या परंपरेने केले. वरवर पाहता भारतीय संतांचे हे कार्य आपणास धार्मिक, पारमार्थिक क्षेत्रातील वाटत असले तरी आपल्या भारतीय संस्कृतीबद्दलचा नितांत अभिमान आणि अस्मिता त्यांच्या साहित्यातून, वचनातून प्रगट झाली आहे.

दक्षिण भारतातून सुरू झालेल्या या भक्ती क्षेत्रातील परिवर्तनाच्या या चळवळीने काही काळातच संपूर्ण भारताचे क्षेत्र व्यापले आणि या भक्ती चळवळीने एकात्मतेचे संस्कार करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संतांचा आणि त्यांच्या कार्याचा विचार करताना जातीपातीला कोणताही थारा दिला जात नाही. सर्व स्तरातून आणि भारतातील अनेक समुदायांतून हे संत निर्माण झाले. आपण त्या विश्वनिर्मात्या एकाच ईश्वराची लेकरे आहोत हे समान सूत्र सर्वांनीच प्रतिपादिले. किमान या स्तरावर तरी जातीनिहाय ईश्वर बदलले नाहीत हे लक्षात घ्यावे लागते. तरी लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेकांनी त्यांचे शोषण केलेच. या धार्मिक शोषणाविरुद्धही भारतीय संतांनी आवाज उठवला. लोककल्याणाची आणि लोकोद्धाराची आंतरिक तळमळ त्यांच्या या कार्यामागची महत्त्वाची प्रेरणा होती.

भारतीय संस्कृतीचा प्राचीन वारसा म्हणजेच आपले वेद वाङ्मय, उपनिषदे, तत्त्वज्ञान, आपली आर्ष काव्ये, महाकाव्ये, पुराण ग्रंथ, श्रीमद्भगवत गीता, श्रीमद्भागवत इत्यादी भारतीय ग्रंथ होत. हे प्राचीन साहित्य म्हणजे भारतीय राष्ट्राची मौलिक संपत्ती आहे. हा समृद्ध संपन्न वारसा जतन करण्याची आणि त्याला उन्नत करून तो नेहमीसाठी प्रवाहित ठेवण्याचे राष्ट्रीय सांस्कृतिक कार्य भारतीय संत महात्म्यांनी केले. महाराष्ट्रात संत ज्ञानदेव यांची ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे ग्रंथ, संत नामदेव यांचे अभंग व आख्यान काव्य, संत एकनाथ यांचा भावार्थ रामायण हा ग्रंथ, तुकोबांची अभंगगाथा, संत रामदास यांचा दासबोध, मनाचे श्लोक, उत्तरेतील संत कबिरांचे दोहे, साकी, सुरदासाचे मधुर अभंग, तुलसीदासांचे तुलसी रामायण, बंगाली संत चैतन्य महाप्रभू यांचे सामूहिक कीर्तन, नरसी मेहता यांचे भजन, मीराबाईची उत्कट भक्तिभावाने ओथंबून भरलेली पदे या सर्व संत साहित्यातून भक्तीबरोबरच प्राचीन भारतीय साहित्याचा आणि भारतीय संस्कृतीचा महान वारसा देदीप्यमान झालेला दिसतो. भक्ती, ज्ञान, रंजन, प्रबोधन यांच्या माध्यमातून भारतीय समाजाला एकात्म राखण्याचे भान जसे या संतांनी अभिव्यक्त केले तसेच मानवतेच्या परम पवित्र सूत्रात एकत्र गुंफण्याचे कार्यही त्यांनी केले. भारतीय संतांचे हे सामाजिक योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आजही भारतीय समाज एकवटतो तो या संत विचाराने प्रेरित होऊनच. आषाढीची वारी हे यासंदर्भातील महत्त्वाचे द्योतक आहे.

एकात्मतेचे, एकसंधतेचे प्रतीक म्हणूनच वारकरी पंथाच्या या पारमार्थिक वाटचालीकडे पाहावे लागेल. भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे, संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील या मागण्यातूनही हाच अर्थ अभिप्रेत आहे. सर्व प्रकारच्या भेदाधिष्ठीत दुरितांचे तिमिर जाऊन स्वधर्म रुपी सूर्य उगवण्याचे जे डोळस स्वप्न संत ज्ञानदेवांनी पाहिले होते त्यातूनही एकात्मतेचि भावनाच ध्वनित होते. उलट वैश्विक एकात्मतेची व्यापक भावना त्यांनी अभिव्यक्त केली. त्यांचा हा विचार उदार असाच होता. आजच्या वैश्विक विचाराच्या काळात भारतीय संतांनी मध्यकाळात मांडलेला हा भक्ती क्षेत्रातील उदारीकरणाचा विचार महत्त्वपूर्ण आहे. 'जे जे भेटे बहुत ते ते मानिजे भगवंत।' हा विचारही असाच व्यापक आहे.महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास महाराष्ट्रीय संस्कृतीची जडणघडण या भक्ती पंथामुळे झाली. महाराष्ट्र संस्कृतीचा प्रारंभ काळ म्हणून या कालखंडाचा अनेकांनी गौरव केला आहे. न्यायमूर्ती रानडे, गं. भा. सरदार प्रभूतींनी यासंदर्भात मूलगामी विवेचन केले आहे.

मराठी भाषा आणि महाराष्ट्र राज्याबद्दलची पहिली अस्मिता संत साहित्यातून अभिव्यक्त झाली. याबाबत संत ज्ञानेश्वर आणि महानुभाव पंथाला याचे श्रेय द्यावे लागते. देशी भाषा आणि तिचा गौरव या साहित्यातून आविष्कृत झाला. महाराष्ट्र भाषेचे, संस्कृतीचे गुणगान गाण्याचे आणि तिची महती व्यक्त करण्याची परंपरा श्री चक्रधर ज्ञानेश्वर यांच्यापासून ते मुक्तेश्वर रामदासांपर्यंत अविच्छन्नपणे सुरू होती, असे प्रतिपादन सरदार यांनी केले आहे. ते यथायोग्यच आहे. कारण महाराष्ट्रीय संस्कृतीच्या अस्मितेचा पहिला हुंकार या पंथीय साहित्यातून आविष्कृत झाला आणि नंतरच्या काळात हा स्वर मोठ्या प्रमाणात उंचावत गेला. मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा। या संत रामदासांच्या वचनातही हीच जाणीव अन्युस्युत आहे. शिवकाळात स्वराज्याच्या स्थापनेसाठी या महाराष्ट्रीय अस्मितेची श्रद्धायुक्त जाणीव खूपच सहाय्यभूत ठरली.

संत साहित्याचे अभ्यासक आणि थोर विचारवंत गं. बा. सरदार यांनी यासंदर्भात म्हटले आहे की, भाषिक व प्रादेशिक अभिमानांच्या रूपाने प्रकट झालेले मराठी समाजातील हे नवचैतन्य महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रातील इतिहास घडवण्यास कारणीभूत झाले आहे. या इतिहासाचे राजकीय व सामाजिक स्वरूप तर मोठे आहेच; पण यापेक्षाही महाराष्ट्रातील भक्ती पंथाचे कार्य सांस्कृतिकदृष्ट्या जास्त व्यापक व मूलगामी आहे. महाराष्ट्राच्या महनीयतेचे आज आपण जे गोडवे गातो त्याची आद्य प्रेरणा म्हणून संत साहित्य आणि मराठी संतांकडे पाहावे लागते हे निर्विवाद आहे.

महाराष्ट्र संस्कृतीचा प्राण म्हणजेच मराठी संत! संत साहित्यानंतर पंडित कवी आणि त्यानंतर निर्माण झालेल्या शाहीर यांच्या साहित्याच्या मुळाशी संत साहित्याचीच प्रेरणा आहे. पंडित कवींच्या काव्यावर जरी संस्कृत साहित्याचा प्रभाव असला तरी त्यांनी मराठी भाषेतून जी रचना केली, त्यामुळेही मराठी साहित्याला नवे परिमाण लाभले हे विसरता येत नाही. शाहिरी वाङ्मय आणि मराठी शाहीर हा तर 'महाराष्ट्राचा प्राणप्रिय' आहे हा उल्लेख दस्तुरखुद शाहिरांनीच केला आहे.

भारतीय संतांनी आपली बोलीभाषा, लोकभाषा प्रतिष्ठित केली. लोकमानसात आपल्या संस्कृतीबद्दल, प्राचीन साहित्याबद्दल श्रद्धाभाव निर्माण करून भारतीय समाजाला भक्तीच्या एका अतूट धाग्यात गुंफून ठेवले. पारमार्थिक क्षेत्रात मध्यकाळातच राष्ट्रीय एकात्मता निर्माण करून सर्व भारतीय संतांनी सामाजिक एकतेचा नारा दिला.

- डॉ. अशोक लिंबेकर

फास्ट फॅशन पृथ्वीचा गळा आवळतेय

फास्ट फॅशन इंडस्ट्री दिवसेंदिवस पृथ्वीच्या गळ्याभोवती आपली सर्परूपी कॉलर घट्ट करतेय हे वास्तव आहे. मानवाच्या निसर्गात होणार्या चुकीच्या हस्तक्षेपाचे परिणाम आपण पाहतच आहोत. त्यात फॅशनच्या आणि पैशांच्या हव्यासापोटी माणूस निसर्गाला नुकसान पोहचवताना दिसत आहे. याचा मोठ्या प्रमाणात परिणाम आता दिसत नसला तरी आगामी काळात हे असंच चालू राहिलं तर निश्चितच गंभीर परिणाम जैवविविधतेवर होताना दिसणार आहेत. त्यामुळे संपूर्ण मानवजातीने या गोष्टीकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

'येताना घेऊनी आलास काय, जाताना घेवुनी जाशील काय, नको अभिमान करू भल्या माणसा' या जुन्या अभंगापासून ते अगदी 'नंगा ही तो आया है क्या लेके जायेगा' या मॉडर्न रॅपमधून एकच अर्थ सांगितला जातो, तो म्हणजे माणूस मृत्यू झाल्यावर या जगातून त्याला आवडेल असं काहीही घेऊन जाणार नाही. एवढ्या मोठ्या कालखंडातील ही शिकवण असूनदेखील आपल्या आवडीच्या गोष्टी करण्याचं मनुष्यप्राण्याने सोडलेले नाही. त्यापैकीच एक गोष्ट म्हणजे आपले कपडे.

माणसाला चांगलं दिसणं आवडतं. चेहर्याला सुंदर करण्यासोबतच आपण छानसे कपडे परिधान करावेत असं प्रत्येकाला वाटतं. आधी मोबाईल, नंतर कॅमेरा आणि त्यानंतर आलेला सोशल मीडिया यामुळे माणसाच्या मानसिकतेला अजूनही नीटनेटकं आणि सुंदर दिसण्याची गरज भासू लागली. अन्न, निवारा आणि वस्त्र यापुढे पण आवडीचे वस्त्र ही जगातील बहुतांश माणसांची आत्यंतिक गरज होऊन बसली आहे आणि यातून निर्माण होते फास्ट फॅशन कपड्यांची मोठी इंडस्ट्री. याच इंडस्ट्री निसर्गाला आणि एकंदरीत जैवविविधतेला मारक ठरतात. या अशा फास्ट फॅशनमुळे झालेल्या, होणार्या आणि होऊ घातलेल्या समस्यांबद्दल बोलणे आणि जागरूकता करणे काळाची गरज बनली आहे.

आता ही फास्ट फॅशन म्हणजे काय? तर एकदम कमी किमतीत चालू फॅशनचे कपडे उपलब्ध करून देणे, कपड्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणे, कपड्यांच्या विक्रीवर भर देणे, त्यानंतर नवी फॅशन आल्यावर त्या नव्या फॅशनचा अंगीकार करून तसे कपडे बाजारात आणणे. आधीचे कपडे कचर्यात टाकणे. गेल्या १५ वर्षांत या फास्ट फॅशन कपड्यांचा उपयोग समाजात वेगाने वाढायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे अशा कपड्यांचे आकर्षण वाढले आणि उत्पादनदेखील, पण या मोठ्या प्रमाणात होणार्या उत्पादनामुळे पृथ्वीवर जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही स्तरांवर मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. या कपड्यांबाबत सगळ्यात खराब गोष्ट ही की हे कपडे पॉलिस्टरपासून बनवले जातात, जे पेट्रोलियममधून बनवलेले एक प्लास्टिक आहे, ज्याला रिसायकल करणे जवळजवळ अशक्यच आहे.

ही फॅशन इंडस्ट्री जगभरात प्रदूषण निर्माण करणार्या उद्योगांपैकी एक आहे. युनायटेड नेशनच्या आकडेवारीनुसार ही इंडस्ट्री जगभरात ९२ मिलियन कापड वेस्ट निर्माण करते तसेच जगभरात निर्माण होणारा १० टक्के ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जित करण्यास कारणीभूत आहे. तसेच जगभरात २० टक्के पाणी या एकट्या इंडस्ट्रीमुळे प्रदूषित होत आहे. उत्पादनाच्या डाईंगपासून अगदी फिनिशिंगपर्यंत मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रदूषण केले जाते. कहर म्हणजे मायक्रो फायबरद्वारे जवळपास २५ टक्के प्रदूषण हे समुद्राचे होत आहे. तेथील जैवविविधतेलाही याचा धोका पोहचत आहे. अशा प्रकारचे प्रदूषण वेळेतच आटोक्यात आले नाही तर २०५० पर्यंत याचा मोठ्या प्रमाणात परिणाम हा पर्यावरणावर होणार आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे.

आपल्या मार्केटिंग क्लुप्त्या वापरून फॅशन कंपन्या आपल्याला वेड्यात काढत आहेत. यापूर्वी भारतात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा याप्रमाणे कपडे वापरले जायचे. त्यामुळे वर्षभरात केवळ या ऋतूंप्रमाणे लोक कपडे विकत घेत होते. आता या फास्ट फॅशनमुळे फॅशनचे तब्बल ५२ मायक्रो सीझन तयार झाले आहेत. आता एक गंभीर बाब तुमच्यासमोर मांडतो, चिली देशातील अटाकामा वाळवंट हे जगातील मोठ्या कोरड्या वाळवंटांपैकी एक आहे, ज्याचा नंबर अंटार्टिका आणि आर्टिकनंतर लागतो. या अटाकामा वाळवंटातील तब्बल ७४० एकर जागा फास्ट फॅशनच्या कपड्यांनी व्यापलेली आहे. फास्ट फॅशन कंपन्यांमध्ये स्पर्धा आहे. या इंडस्ट्रीमध्ये वेगवेगळे आणि जगप्रख्यात ब्रँड आहेत.

या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी किंवा आपला ब्रँड कायम ठेवण्यासाठी या कंपन्या आपल्या जुन्या कपड्यांची विल्हेवाट लावण्याची योजना अंगीकारतात. त्यातूनदेखील मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. खरंतर कपड्यांची अशी विल्हेवाट लावण्याने कंपन्यांना काहीच आर्थिक नुकसान होत नाही, पण पृथ्वीवरील बर्याच घटकांना याचा थेट त्रास होतो. आता दुसरी बाजू येते ती म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात कपडे उत्पादन करताना तेवढेच मनुष्यबळ लागणार. आता हे मनुष्यबळ कोणते वापरले जाते? तर अगदी अल्पवयीन मुलांचा वापरदेखील या इंडस्ट्रीमध्ये केला जातो. त्यात त्यांची आर्थिकदृष्ट्या पिळवणूक केली जाते हे वास्तव आहे. फास्ट फॅशन कपडे बनवण्यासाठी जे कामगार वापरले जातात, त्यात मुख्यत्वे भारत आणि बांगलादेशातील बहुसंख्य कामगार आहेत.

ही फास्ट फॅशन इंडस्ट्री दिवसेंदिवस पृथ्वीच्या गळ्याभोवती आपली सर्परूपी कॉलर घट्ट करतेय हे वास्तव आहे. मानवाच्या निसर्गात होणार्या चुकीच्या हस्तक्षेपाचे परिणाम आपण पाहतच आहोत. त्यात या फॅशनच्या आणि पैशांच्या हव्यासापोटी माणूस निसर्गाला नुकसान पोहचवताना दिसत आहे. याचा मोठ्या प्रमाणात परिणाम आता दिसत नसला तरी आगामी काळात हे असंच चालू राहिलं तर निश्चितच गंभीर परिणाम जैवविविधतेवर होताना दिसणार आहेत. त्यामुळे संपूर्ण मानवजातीने या गोष्टीकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. तसेच प्रत्येक देशातील

सरकारांनीही याबाबत महत्त्वाची पावले उचलणे आवश्यक आहे. सरकारने फास्ट फॅशनमुळे होणार्या दुष्परिणामांना आळा घालण्यासाठी सरकारी स्तरावर पॉलिसी आखणे गरजेचे आहे. सध्या फास्ट फॅशन ब्रँड्सवर म्हणावे तेवढे निर्बंध नाहीत. त्यांच्यावर आर्थिकदृष्ट्या निर्बंध येणे गरजेचे आहे. आटोक्याबाहेर गेलेल्या कंपन्यांना पट्टा घालण्याची हिंमत सरकारला दाखवावी लागेल. सरकारसोबत वैयक्तिक स्तरावरही नागरिकांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. फास्ट फॅशनचा मोह जरी आवरता आला नाही तरी एक कपडा जास्तीत जास्त वेळा वापरण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तसेच कॉटनचे कपडे वापरणे एक उत्तम पर्याय असू शकतो. माणूस म्हणून पृथ्वीवर राहताना या भूमीचे आणि त्याच्या इतर स्त्रोतांचे नुकसान न करता निसर्गाला अभिप्रेत अशी जीवनशैली अंगीकारण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या विरोधात जाऊन नेमकं काय पदरात पडतं हे मानवजातीने याआधीही अनुभवलं आहे. फास्ट फॅशनच्या नादात निसर्गावर होणारा अत्याचार आपण थांबवला पाहिजे. अंगावर निरनिराळे कपडे घालताना आपण असेच जर पर्यावरणावर अत्याचार करीत राहिलो, तर हा निसर्ग एक दिवस आपलेच कपडे काढायला मागेपुढे पाहणार नाही, मग फास्ट फॅशनची वस्त्रे सोडाच, अन्नही नसेल आणि निवारादेखील.

-रोशन चिंचवलकर

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

आरोग्य

महिलांमध्ये असते 'या' व्हिटामिनसची कमतरता

महिलांनी आपले आरोग्य हेल्दी ठेवण्यासाठी डाएटमध्ये अशा काही गोष्टींचा समावेश केला पाहिजे ज्यामध्ये पोषक तत्त्वांची कमतरता पूर्ण केली जाईल. अशातच आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की, महिलांमध्ये अशा कोणत्या व्हिटॅमिन्स-मिनिरल्सची कमतरता असते आणि ती कशी दूर करावी याच बद्दल अधिक.

लोह : महिलांमध्ये लोहाची कमतरता अधिक असते. कारण महिलांना प्रत्येक महिन्याला पीरियड्समधून जावे लागते. या दरम्यान खुप ब्लीडिंग होते. हेच कारण आहे की, लोहाची महिलांना अधिक गरज असते. लोहाच्या कमतरतेमुळे एनीमियाची समस्या होऊ शकते. या व्यतिरिक्त थकवा, श्वास घेण्यास समस्या, चक्कर येणे अशा सुद्धा समस्या उद्भवू शकतात.

महिलांनी आपल्या शरिरात लोहाची कमतरता भरुन काढण्यासाठी आपल्या डाएटमध्ये लोहयुक्त फूड्स. जसे की, रेड मीट, पोल्ट्रीयुक्त फूड्स, मासे, फळं, टोफू, पालक याचे सेवन केले पाहिजे.

कॅल्शिअम : कॅल्शिअम हाडांच्या आरोग्यासाठी आणि ऑस्टियोपोरोसिस पासून दूर राहण्यासाठी फार महत्त्वाचे असते. नॅशनल ऑस्टियोपोरोसिस फाउंडेशनच्या नुसार, जर महिलेचे वय ५० किंवा त्यापेक्षा कमी असेल तर प्रतिदिनी १ हजार मिलीग्राम कॅल्शिअमची आवश्यकता असते. तसेच महिलेचे वय ५१ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर प्रतिदिन १२०० मिलीग्राम कॅल्शिअमची आवश्यकता असते. याची पुर्तता पूर्ण करण्यासाठी डेयरी प्रोडक्ट्स, पालेभाज्या, बदाम, चीज, दही, पनीर आणि दूधाचे सेवन केले पाहिजे.

मॅग्नेशिअम : मॅग्नेशिअम शरिरातील स्नायूंच्या कार्यासाठी आणि हाडांच्या आरोग्यासाठी फार महत्त्वाचे असते. हे शरिरात विविध केमिकल प्रोसेसिंगमध्ये फार महत्त्वाची भुमिका निभावतात. महिलांमध्ये बहुतांशवेळा याची कमतरता भासते. याची कमतरता दूर करण्यासाठी तुम्ही डाएटमध्ये ड्रायफ्रुट्स, नट्सचा समावेश करु शकता.

उच्च तापासह उलट्या ठरू शकतात जीवघेण्या, डेंग्यूची ही आहेत धोकादायक लक्षणे

देशभरात पुन्हा एकदा डेंग्यूचे रुग्ण वाढू लागले आहेत. या आजाराने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्याही वाढू लागली आहे, ही चिंतेची बाब आहे. गाझियाबादपासून पश्चिम बंगालपर्यंत डेंग्यूने थैमान घातले आहे. बंगालमध्ये या आजारामुळे ८ मृत्यू झाले आहेत, तर गाझियाबादमध्येही २० वर्षीय तरुणाचा डेंग्यूने मृत्यू झाला आहे. अशा परिस्थितीत या आजाराचा धोका सातत्याने वाढत आहे. डेंग्यूची काही लक्षणे प्राणघातक ठरू शकतात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. ते दिसताच ताबडतोब रुग्णालयात जावे. निष्काळजीपणामुळे मृत्यू होऊ शकतो.

आता प्रत्येक नवीन दिवसाबरोबर डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ होणार असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत, त्याची लक्षणे ओळखणे आणि वेळेवर उपचार करणे खूप महत्वाचे आहे. यावेळी कोणाला ताप येत असेल, तर डेंग्यूची तपासणी करून घ्यावी. यावरून हा ताप डेंग्यूचा आहे की नाही, हे कळेल. डेंग्यू असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार सुरू करा.

याबाबत वरिष्ठ फिजिशियन सांगतात की, डेंग्यूमध्ये आधी सौम्य ताप येतो, तो काही दिवसांत बरा होतो, पण उलट्या आणि जुलाबांसह ताप रोज वाढत असेल, तर ही लक्षणे धोकादायक डेंग्यूची आहेत. या स्थितीत, रुग्णाला डेंग्यू शॉक सिंड्रोम असू शकतो, ज्यामुळे शरीरातील प्लेटलेट्सची संख्या अचानक कमी होऊ लागते. रुग्ण बेशुद्ध होऊ लागतो. काही प्रकरणांमध्ये अवयव निकामी देखील होऊ शकतात. जे घातक ठरू शकते. अशा परिस्थितीत एखाद्याने त्वरित रुग्णालयात जावे. निष्काळजीपणा केल्यास मृत्यूचा धोका असतो.

फिजिशियन सांगतात की, रुग्णाला ताप येतो, पण डेंग्यूची तपासणी होत नाही अशी अनेक प्रकरणे आहेत. त्यामुळे वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि रुग्णाचा मृत्यू होतो. हे टाळण्यासाठी ताप आल्यास डेंग्यूची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. याची पुष्टी झाल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. डॉक्टर तुमच्या काही चाचण्या लिहून देऊ शकतात आणि औषधांद्वारे रोग नियंत्रित करू शकतात. हे गंभीर लक्षणे टाळू शकते.

या लक्षणांकडे लक्ष द्या

१०० अंशांपेक्षा जास्त ताप
उलटचा आणि अतिसार (उलटीमध्ये रक्त)
तीव्र डोकेदुखी
स्नायू दुखणे
अशा प्रकारे करा संरक्षण
घराभोवती पाणी साचू देऊ नका
शरीर हायड्रेटेड ठेवा
पूर्ण बाह्यांचे कपडे घाला
झोपताना मच्छरदाणी वापरा

साबुदाणा खाणं खरंच आरोग्यासाठी फायदेशीर की घातक? तज्ज्ञांचं मत जाणून घ्या

साबुदाणा हा भारतीयांमध्ये एक अतिशय लोकप्रिय आणि आवडीचा खाद्यपदार्थ आहे. विशेषत: भारतामध्ये उपवासाच्या वेळी हा एक उत्तम खाद्यपदार्थ मानला जातो. पण साबुदाण्यामध्ये खरोखर काही पोषक घटक आहेत का, जे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. फक्त या पदार्थाचा प्रचार केला गेला म्हणून आपण याचं सेवन करतो. साबुदाणा खाणं खरच फायदेशीर आहे का? याबद्दल तज्ज्ञांचं मत काय आहे, जाणून घ्या.

साबुदाणाबाबत तज्ज्ञांचं मत काय?

साबुदाण्याच्या फायद्यांविषयी बोलताना एक्सपर्ट क्रिस अशोक यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरील व्हिडीओमध्ये सांगितलं आहे की, त्यांना साबुदाणा खायला आवडतो. तो स्वादिष्ट देखील आहे. पण साबुदाणा म्हणजेच अतिशय अल्ट्रा प्रोसेस्ड स्टार्च आहे. जर तुम्ही उपवासाच्या वेळी ते खात असाल तर, त्यामुळे तुमच्या रक्तातील साखर वाढेल, असा याचा अर्थ होत नाही. आता बाजारात मिळणारा साबुदाणा हा पारंपारिक साबुदाणा नाही. पारंपारिक साबुदाणा सुरुवातीला १९४० ते १९५० च्या दशकात उपलब्ध होता. आता तो मिळत नाही. क्रिस अशोक यांच्या मते, साबुदाणा खाणे चविष्ट वाटत असले तरी ते आरोग्यदायी नाही असं त्यांचं मत आहे.

साबुदाणा हा अत्यंत प्रोसेस्ड

स्टार्चचा एक प्रकार आहे. आणखी एक आहार आणि पोषणतज्ज्ञ मुग्धा प्रधान यांनी देखील सांगितलं आहे की, साबुदाणा हा अत्यंत शुद्ध केलेल्या स्टार्चचा एक प्रकार आहे, जो कसावा किंवा साबुदाणा वनस्पतीच्या मुळांपासून मिळतो. ते इतके शुद्ध केलं जातं की, ते रक्तामध्ये फार लवकर शोषलं जातं आणि रक्तातील साखर वेगाने वाढतं. हे एक अतिशय उच्च ग्लायसेमिक अन्न आहे, म्हणजेच त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स (GI) इंडेक्स खूप जास्त आहे. GI म्हणजेच रक्तातील साखरेच्या पातळीचं मोजमाप.

'या' लोकांनी साबुदाणा खाणं टाळावं

मधुमेह आणि उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि हृदयविकार यासारख्या इतर चयापचयाशी संबंधित समस्या असलेल्या लोकांनी असे पदार्थ टाळावेत. जर तुम्हाला मधुमेह आणि चयापचयाशी संबंधित समस्या नसतील, तर तुम्ही संतुलित आहाराचा भाग म्हणून साबुदाणा खाऊ शकता. साबुदाणा हा कर्बोदकांचा चांगला स्रोत आहे आणि झटपट ऊर्जा देऊ शकतो. साबुदाणा ग्लूटेन-मुक्त आहे आणि पचायला सोपं आहे, ज्यामुळे लोकांना पचायला साबुदाणा पचायला सोपा जातो.

साबुदाणा खाण्याचे तोटे

साबुदाण्याचे दररोज सेवन केले तर शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढते. ज्यांना मधुमेहाचा त्रास आहे त्यांनी साबुदाणा खाणं टाळावं. साबुदाणा रक्तात लगेच शोषला जातो, त्यामुळे साबुदाणाचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी आणखी वाढण्याची शक्यता असते. साबुदाण्यामध्ये कॅलरी आणि कार्बोहायड्रेट्स जास्त असतात, त्यामुळे ते जास्त प्रमाणात खाल्ल्याने वजन वाढू शकते.

व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेमुळे शरीरात दिसतात ही लक्षणे, सुरू करा हे पदार्थ खाणे

आपल्या शरीराच्या चांगल्या कार्यासाठी दररोज अनेक प्रकारची जीवनसत्त्वे आवश्यक असतात, परंतु आजकालच्या खराब अन्नामुळे शरीराला जीवनसत्त्वे नक्कीच मिळत नाहीत. यामुळे व्हिटॅमिनची कमतरता निर्माण होते. यामध्ये व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेची अधिक प्रकरणे पाहिली जात आहेत. डॉक्टरांच्या मते, व्हिटॅमिन बी १२ चे काम लाल रक्तपेशी बनवणे आणि मज्जासंस्था चांगली ठेवणे हे आहे. त्याची कमतरता मेंदूच्या कार्यावरही परिणाम करू शकते. अशा परिस्थितीत या जीवनसत्त्वाची कमतरता हलक्यात घेऊ नये.

डॉक्टरांच्या मते, व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे अशक्तपणा, न्यूरोलॉजिकल समस्या, त्वचा पिवळी पडणे, वजन कमी होणे आणि हृदय गती वाढणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. शरीरात या जीवनसत्त्वाची सतत कमतरता राहिल्यास डोकेदुखी, कोणत्याही कामात लक्ष न लागणे, तोंडाला फोड येणे अशा समस्या उद्भवू शकतात.

प्रौढ व्यक्तीला दररोज २.४ मायक्रोग्रॅम व्हिटॅमिन बी १२ आवश्यक असते. एवढ्या प्रमाणात जीवनसत्व उपलब्ध नसेल, तर त्याची कमतरता शरीरात सुरू होते. हे ओळखण्यासाठी, व्हिटॅमिन बी १२ ची नियमित तपासणी करा. जर ते कमी होत असेल तर आहाराकडे लक्ष द्या आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या. डॉक्टर काही औषध घेण्याचा सल्ला देऊ शकतात किंवा व्हिटॅमिन बी १२ इंट्रामस्क्युलर इंजेक्शन घेण्याचा सल्ला देऊ शकता. याशिवाय काही पदार्थांचा आहारात समावेश करूनही या जीवनसत्त्वाची कमतरता टाळता येते.

शरीरातील व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी तुम्ही बदाम, दूध, दही, मासे, अंडी किंवा लाल मांस यांसारख्या आरोग्यदायी गोष्टींचा आहारात समावेश करू शकता. या पदार्थांव्यतिरिक्त आपल्या आहारात हिरव्या आणि पालेभाज्यांचा समावेश करा. तसेच दिवसभर योग्य प्रमाणात पाणी प्या.

नळाला गढूळ पाणी येतयं? मग करा हे उपाय

पावसाळ्यात होणाऱ्या आजारांचे मूळ कारण पाणी असते.या दिवसात नळातून मातकट गढूळ पाणी येणे सामान्य असते. कारण पावसाच्या पाण्याने फुल भरलेल्या टाक्या प्रत्येकवेळी साफ केल्या जात नाहीत. यामुळे याच टाकीचे पाणी नळातून थेट आपल्या घरात येते. पण पावसाळ्यात पाण्यातून मेटालिक रस्ट, टॉक्सिक मटेरियल, लेड, ॲल्युमिनियम, कॅल्शियम, यासारखे बरेच घटक पाण्यात येतात.

यामुळे नळांना फिल्टर लावले जाते. जर पाण्यात फक्त क्लोरिनचा प्रॉब्लेम असेल तर तर टाकी स्वच्छ करता येते. पण जर त्यात वेगळ्या गोष्टीही असतील तर फिल्टरच यासाठी उपयोगी असते. यामुळे पावसाळ्यात नळांना फिल्टर बसवून घ्यावे.

आता तर बाजारात पोर्टेबल फिल्टरही आले आहेत. जे आपण नळचं नाही तर शॉवर हॅडवरही लावू शकतो. नळाच्या तोटीवरही हे फिल्टर बसवता येतात. त्यामुळे आंघोळ करताना पाण्याबरोबर आलेले चिखल मातीचे सूक्ष्म

कणही या फिल्टरमध्ये अडकतात आणि स्वच्छ पाणी बाहेर येते.

तुरटी : पावसाळ्यात बऱ्याचवेळआ नळाला गढूळ आणि मातकट पाणी येते.अशावेळी पाणी स्वच्छ करण्यासाठी बादलीत पाणी घेऊन त्यात तुरटीचा एक तुकडा टाकावा.त्यामुळे पाणी स्वच्छ होते.

बेकींग सोडा/ सोडियम बायकार्बोनेट : जर नळाला येणाऱ्या पाण्यातून मातीचे कण येत असतील तर केमिकल वापरूनच असे पाणी स्वच्छ केले जाते. त्यासाठी बादलीतील पाण्यात अर्धा चमचा बेकींग सोडा/ सोडियम बायकार्बोनेट यापैकी एक केमिकल टाकावे. तसेच वापरापूर्वी या केमिकलच्या पाकीटावर लिहलेल्या सुचनाही नीट वाचून घ्याव्यात.

क्लोरीन : क्लोरिनचे पाणी कमी वेळात स्वच्छ होते. यामुळे पाण्याच्या मोठ्या टाका, टँकर्स, यात क्लोरिनच्या गोळ्या टाकल्या जातात. यामुळे पाणी पिण्यायोग्य स्वच्छ होते.२० ास ची एक गोळी ५ लीटर पाण्यासाठीही काम करते. त्यामुळे पाणी स्वच्छ होऊन गाळ,कचरा टाकी किंवा भांड्याच्या तळाशी बसतो. या प्रक्रियेला ४-५ तास एवढा अवधी लागतो.

साधारण ३५ टक्के लहान मुलांमध्ये फॅटी लिव्हर आजाराचा वाढता धोका



यकृत हा शरीरातील सर्वात महत्त्वाचा अवयव आहे. यकृतामध्ये समस्या असल्यास संपूर्ण शरीराला त्याचा त्रास होतो. त्यातही जर मुलाचे यकृत खराब होऊ लागले तर संपूर्ण आयुष्य धोक्यात येते. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स)अलीकडेच, एका अभ्यासात दावा करण्यात आला आहे की, ३८ टक्के भारतीय नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगाने ग्रस्त आहेत. या अभ्यासातून एक चिंतेची बाब समोर आली आहे. या अभ्यासात असे आढळून आले आहे की, ३५ टक्के मुले फॅटी लिव्हरच्या आजाराला बळी पडतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे अशाप्रकारे मुलांचे यकृत खराब होण्यामागे कोणतेही बाह्य कारण नसून मुलं घरून टिफिनमध्ये जे अनहेल्दी पदार्थ खात आहेत ते कारणीभूत आहेत. एम्सचा हा अभ्यास 'जर्नल ऑफ क्लिनिकल अँड एक्सपेरिमेंटल हेपॅटोलॉजी'मध्ये प्रकाशित झाला आहे.

नॉन-अल्कोहोलिक फॅटी यकृत रोगाची कारणे

एम्सच्या अहवालात म्हटले आहे की, नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यात आढळून येत नाहीत. कारण त्याची लक्षणे दिसत नाहीत. वाढत्या काळानुसार हा आजारही वाढू लागतो. पुढे जाऊन ते यकृताशी संबंधित गंभीर आजारांचेही कारण बनते. छ-ऋऊ साठी चार कारणे असू शकतात. मधुमेह नियंत्रणात नसेल आणि कोलेस्ट्रॉल किंवा डिस्लिपिडेमिया असेल तर छ-ऋऊ होऊ शकतो. याशिवाय वजन वाढले असेल तर जीवनशैलीमुळे फॅटी लिव्हरचे आजार होतात. वाईट जीवनशैलीचे कारण म्हणजे व्यायाम न करणे, अधिक तळलेले आणि प्रक्रिया केलेले अन्न न खाणे, तसेच जास्त गोड आणि लाल मांस न खाणे ही कारणे आहेत.

मुलांमध्ये फॅटी लिव्हरचे

AIIMS अभ्यासातून धक्कादायक खुलासा

आजार का वाढत आहेत

संशोधनानुसार भारतात शहरीकरण झपाट्याने होत आहे. शहरीकरणामुळे लोकांची जीवनशैलीही बदलत चालली आहे. आजकाल लोक इतके व्यस्त आहेत की ते शारीरिक हालचाली करत नाहीत. आजकाल लोक जास्त पॅकेट, प्रक्रिया केलेले आणि जास्त कॅलरी असलेले पदार्थ खातात. त्यामुळे वजन झपाट्याने वाढू लागते. आणि वाढत्या वजनामुळे चयापचयाच्या समस्या सुरू होतात. यामुळेच नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर सारखे रोग होतात. आजकाल मुलांच्या आहारात पाश्चात्य पदार्थांचा अधिकाधिक समावेश केला जात आहे. रिफाइंड कार्बोहायड्रेट्स, सॅच्युरेटेड फॅट आणि शर्करायुक्त पेये यामध्ये खूप सामान्य आहेत. हे पदार्थ खाल्ल्याने बाहेर पडणारी वाईट चरबी यकृताच्या आसपासच्या भागात चिकटू लागते. दुसरे सर्वात मोठे कारण म्हणजे मोबाईल, टीव्हीचा अतिवापर हे आहे.

या मुलांना फॅटी लिव्हर आजार होण्याची शक्यता असते

ज्यांच्या कुटुंबात मधुमेह किंवा लठ्ठपणाची समस्या आहे. त्यांना फॅटी लिव्हर रोगाचा धोका वाढतो. कौटुंबिक पार्श्वभूमी आणि अनुवांशिक पूर्वस्थिती देखील या आजारामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आजही फॅटी लिव्हरबद्दल लोकांमध्ये जागरुकता कमी आहे. हा आजार योग्य वेळी आढळून आला तर यावर वेळीच उपचार करता येतात. पण उशिरा आढळल्यास तो दिर्घकालीन आजार बनतो.

उष्टे खाल्ल्याने प्रेम नाही तर आजार वाढतात...डॉक्टरांनी दिला सावधनतेचा इशारा

एकमेकांचे उष्ट अन्न खाल्ल्याने प्रेम वाढते असे म्हणतात. अनेकदा आपल्या घरातही कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या ताटातलं खाणं पसंत करतात. प्रेम वाढतं असं सांगत प्रेमी युगुल, मित्रपरिवारदेखील एकमेकांचं उष्टं खाणं पसंत करतात. मात्र, डॉक्टरांच्या मते प्रेम वाढेल की नाही, हे सांगता येणार नाही. पण आजाराचा धोका मात्र, वाढतो. कोणाचेही उष्टं खाऊ नका असा सल्लाही आरोग्य तज्ज्ञ देतात. यामुळे आरोग्याला गंभीर धोका होऊ शकतो, असे त्यांनी म्हटले.

संसर्गाची भीती : जेव्हा आपण एकाच ताटात एकमेकांचे उष्टं अन्न खातो. तेव्हा संसर्ग पसरण्याचा धोका असतो. जर तुम्ही कोणत्याही आजाराने बाधित व्यक्तीचे उष्टं खात असाल तर ते धोकादायक ठरू शकते. एकाच ताटात खाल्ल्याने सर्दी, फ्लू किंवा गॅस्ट्रोइंटेस्टाइनल यांसारखा संसर्ग सहज पसरू शकतात. म्हणूनच चुकूनही आजारी व्यक्तीसोबत एकाच ताटात अन्न खाऊ नये.

पचन समस्या : जेव्हा तुम्ही दुसऱ्याच्या ताटात अन्न खाता तेव्हा ते स्वच्छ आहे की नाही किंवा जेवण देणारी व्यक्ती किती स्वच्छतेने भांडी वापरत आहे हे तुम्हाला माहीत नसते. त्यामुळे अन्नामध्ये बॅक्टेरिया किंवा विषाणू येऊ शकतात. स्वच्छतेच्या अभावी जंतू पोटात प्रवेश करू शकतात, ज्यामुळे पचनाचा त्रास होऊ शकतो.

पोषक तत्वांची कमतरता : जेव्हा आपण दुसऱ्याच्या ताटात अन्न खातो तेव्हा शरीराला योग्य प्रमाणात पोषक द्रव्ये मिळत नाहीत. म्हणजे शरीराला आवश्यक ते पोषण मिळणार नाही.

ॲलर्जी समस्या : दुसऱ्याचे उष्टं अन्न खाल्ल्याने ऍलर्जी पसरू शकते. दुसऱ्याची प्लेट शेअर केल्याने क्रॉस कंटॅमिनेशन होऊ शकते. ज्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. तुम्ही आजारी देखील होऊ शकता.

जेवताना लक्ष द्या

जेवण्यापूर्वी हात चांगले धुवा

चमचे, भांड्यांचा वापर करू अन्न वाढा

जर एखाद्याला विशिष्ट खाद्यपदार्थाने अन्नाची ऍलर्जी असेल तर त्याला त्याबद्दल सांगा.

उष्टं खाणे शक्यतो टाळा. असे करणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी पिणं खरंच गरजेचं आहे का?

१. पचन आणि चयापचय सुधारते : दररोज सकाळी रिकाम्या पोटी एक ग्लास कोमट पाणी प्यायल्याने चयापचय गतिमान होते आणि पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते.

२. डिटॉक्सिफिकेशन : गरम पाणी नैसर्गिक डिटॉक्सिफायर म्हणून काम करते. म्हणजेच, जर तुम्ही रोज सकाळी रिकाम्या पोटी गरम पाणी प्यायले तर तुमचे शरीर आपोआप डिटॉक्स होईल. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करेल. गरम पाण्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे घाम येण्या सुरुवात होते. तसेच, शरीरात साचलेली घाण घामानेच बाहेर पडते.

३. वजन कमी करण्यास मदत होते : जे लोक वजन कमी करण्याचा प्रयत्न करतात त्यांनी सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी प्यावे. यामुळे भूक नियंत्रित करता येते. तसेच, तुम्हाला जास्त प्रमाणात न खाण्याची भावना विकसित होते. गरम पाणी चयापचय गतिमान करते आणि कॅलरी बर्न करण्यास मदत करते.

४. हायड्रेशन : सकाळी लवकर कोमट पाणी प्यायल्यानेही शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते. हायड्रेटेड राहिल्याने शरीराला विविध कार्य करणे सोपे जाते. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. गरम पाण्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे घाम येण्यास सुरुवात होते. शरीरात साचलेली घाण घामानेच बाहेर पडते.

लातूर
भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com

लातुरात शनिवारी राज्यस्तरीय पर्यावरण परिषद

लातूर : वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर आणि ट्री ट्रस्ट ऑफ इंडिया, उत्तराखंड यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शनिवारी अर्थात ५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ यावेळेत राज्यस्तरीय पर्यावरण परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ही परिषद भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात होणार असून, या परिषदेत 'पर्यावरण : काल, आज आणि उद्या' याबद्दल विचारमंथन होणार आहे. परिषदेचे उद्घाटन पुण्याचे आईएस अधिकारी धानेश स्वामी यांच्या हस्ते होणार असून यावेळी अहमदपूरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

समाज कल्याण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था, समाजसेवक यांना मिळणार पुरस्कार

लातूर : समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व समाजसेवक यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. त्यानुसार सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारासाठी १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठी यापूर्वी अर्ज केला असल्यास नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र, ज्या वर्षासाठी अर्ज केला आहे, त्या वर्षासाठीचा चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करावा. पूर्वी अर्ज केलेल्या व्यक्तींनी पुन्हा अर्ज केल्यास त्या अर्जाचाही विचार करण्यात येईल. ज्या वर्षांसाठी व ज्या पुरस्कारांसाठी अर्ज करण्यात येत आहे, त्या वर्षासाठी त्या पुरस्कारासाठी विहित केलेल्या अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील. तसेच पुरस्कारासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी गणना विचारात घेण्यात येईल.

महसूल दिन कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

लातूर : महसूल विभाग हा प्रशासनातील सर्वात महत्वाचा विभाग आहे. त्यामुळे शासनाच्या सर्वाधिक योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी ह्या विभागाकडे असून सर्वसामान्य जनतेच्या जीवनाला स्पर्श करणारा हा विभाग आहे. त्यामुळे महसूल विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वसामान्य नागरिक हा केंद्रबिंदू मानून संवेदनशीलपणे आणि संवादात्मक होवून एकोप्याने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

महसूल दिनी लातूर येथील भक्ती शक्ती मंगल कार्यालयात आयोजित महसूल सप्ताहाच्या उद्घाटन कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते झाले. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कृष्णा चावरे, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, डॉ. सुचिता शिंदे, गणेश महाडिक, नितीन वाघमारे, प्रियांका कांबळे, अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी शोभा जाधव, रोहिणी नन्हे-विरोळे, प्रवीण फुलारी, प्रतीक्षा भुते, अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, सर्व तहसीलदार यावेळी उपस्थित होते.

निवडणूक ते नैसर्गिक आपत्ती या प्रत्येक बाबतीत महसूल विभागाची प्रमुख भूमिका आहे. सर्वसामान्य जनतेला योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच त्यांच्या मनातील प्रशासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यालयात समस्या घेवून येणाऱ्या नागरिकांशी सुसंवाद ठेवून, त्यांची तक्रार केवळ कागद म्हणून न वाचता ती तक्रार मानवी दृष्टीकोन ठेवून समजून घेवून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावा. 'संवादात्मक आणि संवेदनशील प्रशासन' अशी प्रतिमा जनतेच्या मनात निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रशासनाची जनतेच्या मनातील प्रतिमा उंचाविणे, हाच आपल्यासाठी खरा पुरस्कार असेल, अशी भावना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्ह्यात जलव्यवस्थापन, 'गाव तिथं स्मशानभूमी' आणि 'कुटुंब तिथं वृक्ष' मोहीम राबविण्यात येणार आहे. यासोबतच शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन गतिमान, गुणवत्तापूर्ण बनविण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रशासनाचा कणा असलेल्या महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून गतिमान आणि संवेदनशील प्रशासनाची अपेक्षा व्यक्त करताना त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी वैयक्तिक लक्ष देणार असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

महसूल सप्ताह कालावधीत सर्व कार्यालयांमध्ये 'माझे कार्यालय, सुंदर कार्यालय' संकल्पना राबवून आपले कार्यालय स्वच्छ, सुंदर आणि स्मार्ट बनविण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच महसूल कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक प्रश्नांचा आस्थापूर्वक विचार करून या प्रश्नाचा निपटारा केला जाईल. महिला अधिकारी, कर्मचारी यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल, असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

वर्षभर शासकीय कर्तव्य पार पाडण्यासाठी राबणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्याची संधी महसूल दिनासारख्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मिळते. आपल्या विभागातील कर्तव्यदक्ष अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कौतुक करणे, सर्वांना एकत्रित आणून त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी महसूल दिनासारखे उपक्रम सर्वच शासकीय विभागांमध्ये आयोजित केले जावेत, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी यावेळी केले.

महसूल विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला महसूल सप्ताह अतिशय चांगला उपक्रम आहे. यानिमित्त सात दिवस होणारे वेगवेगळे कार्यक्रम कौतुकास्पद आहेत. महसूल विभाग हा प्रशासनातील महत्त्वाचा विभाग असून सर्व शासकीय विभागांमध्ये प्रमुख समन्वयकाची भूमिका ठेवून शासकिय योजनांचा अंमलबजावणी करण्याचे काम हा विभाग करतो. कायदा व सुव्यवस्थेमध्ये ह्या विभागाची भूमिका महतत्वपूर्ण असल्याचे श्री. मुंडे यावेळी म्हणाले.

जिल्ह्यात महसूल सप्ताहाला आजपासून सुरुवात झाली. या अंतर्गत विविध योजनांच्या लाभाचे वितरण करण्यात आले. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत, संजय गांधी निराधार योजनेचे मंजुरीपत्र, शिधापत्रिका, रहिवासी प्रमाणपत्र, नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीच्या मदतीचे धनादेश, मतदार ओळखपत्र आदी बाबींचा यामध्ये समावेश होता. तसेच तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्राचेही यावेळी वितरण करण्यात आले.

गेल्या वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचा महसूल दिनी सन्मान करण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांचा उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून तर उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुचिता शिंदे यांचा निवडणूक कामकाजात उत्कृष्ट कामिगीरबद्दल सन्मान करण्यात आला. जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार संवर्गातील कुलदीप देशमुख, सुरेश पाटील, संतोष गुट्टे, धनेश दंताळे, रंगनाथ कराड यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यासोबतच लघुलेखक, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, महसूल सहायक, तलाठी, वाहन चालक, शिपाई आणि कोतवाल संवर्गातील कर्मचाऱ्यांचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती नागरिकांना व्हावी, यामध्ये लाभधारकांचा सकारात्मक सहभाग वाढावा, यासाठी १ ऑगस्टपासून ते ७ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. आज महसूल दिनी महसूल सप्ताहचे उद्घाटन झाले असून २ ऑगस्ट रोजी युवा संवाद, ३ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा, ४ ऑगस्ट रोजी जनसंवाद, ५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट रोजी महसूल विभागातील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाची सांगता होणार आहे.

उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी, नायब तहसीलदार श्री. वेरुळे, तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे भरत सूर्यवंशी, महसूल कर्मचारी संघटनेचे माधव पांचाळ, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी, तलाठी-मंडळ अधिकारी संघटनेचे अध्यक्ष महेश हिप्परगे, चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रमजान मुंडे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच जिल्ह्याला विकासाच्या क्षेत्रात अग्रेसर ठेवण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आपली जबाबदरी प्रामाणिकपणे पार पाडतील, अशी ग्वाही दिली. दीपप्रज्वलन आणि लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांनी प्रास्ताविकात महसूल विभागाने गेल्या वर्षात केलेल्या कामगिरीचा लेखाजोखा मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपविभागीय अधिकारी शोभा जाधव, तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी केले. उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, भूमि अभिलेख कार्यालयासह इतर शासकीय विभागाचे स्टॉल याठिकाणी लावण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिकांबद्दल जनजागृती करणे ही आधुनिक काळाची गरज - प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १ ऑगस्ट २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक 'जेन लामार्क' यांची २७९ वी व 'जॉर्ज चार्ल्स डी हेवेसी' यांची १३८ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांच्यासमवेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलसचिव, संलग्निकरण विभाग डॉ. रवी सरोदे, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदपूर येथील आयक्यूएसी समन्वयक डॉ. डी. एम. मुगळे, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, येथील आयक्यूएसी समन्वयक डॉ. कमलाकर गव्हाणे, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील आयक्यूएसी समन्वयक डॉ. शेवाळे, आयक्यूएसी समन्वयक व उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे या सर्वांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.

वैज्ञानिकांबद्दल बी. एस्सी. जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी अमीशा गवळी हिने हिंदीत, बी. एस्सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी श्रुती गंगाथडे यांनी मराठीत, बी.एस्सी.जैवंत्रज्ञान प्रथम वर्षाचा विद्यार्थी आर्यन गिरवलकर व बी. एस्सी. जैवंत्रज्ञान द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आशुतोष शेटे यांनी इंग्रजीत माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.स्वरूप गावकरे व बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी प्रीति बोरगावे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांनी व्यक्त केले.

विविध विकास कामांसाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून ५ कोटींचा निधी मंजूर

लातूर : राज्य शासनाच्या नगर विकास विभागाअंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून रेणापूर नगरपंचायत अंतर्गत मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना बांधकाम करणे आणि बालाजी मंदिर येथे सभागृह बांधकाम करणे यासह विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून सदरील निधी मंजूर झाल्याबद्दल आ. कराड यांचे रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

रेणापूर नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर राज्य शासनाच्या नगर विकास विभागाअंतर्गत भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून नगरपंचायत इमारत बांधकाम, पाणीपुरवठा योजना, अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, अग्निशामन इमारत व वाहन यासह विविध विकास कामासाठी आजपर्यंत कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असून त्यातील काही कामे पूर्ण झाली आहेत तर काही कामे प्रगतीपथावर आहेत.

रेणापूर येथील मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना बांधकाम व्हावे आणि बालाजी मंदिर येथील विविध शुभकार्यासाठी लागणारे भव्य सर्व सोयींनी युक्त सभागृह व्हावे अशी अनेक दिवसांची मागणी होती. या दोन्ही कामासाठी अनेक वेळा अनेक पुढाऱ्यांनी आश्वासने दिली मात्र प्रत्यक्षात कृती कोणीच केली नाही. याकामासह रेणापूर शहरातील विविध विकास कामांना वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान योजनेअंतर्गत निधी मिळावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पाठपुरावा केला. आ कराड यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाच्या नगर विकास विभागकडून ३१ जुलै २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना बांधकाम आणि बालाजी मंदिर येथे सभागृह बांधकाम व इतर विकास कामासाठी तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

नगर विकास विभागाअंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मुस्लिम बांधवासाठी शादीखाना बांधकाम करणे दोन कोटी, बालाजी मंदिर येथे सभागृह बांधकामासाठी एक कोटी रुपये, प्रभाग १४ - रूपचंद नगर येथे स्मशानभूमी शेड बांधकाम व सुशोभीकरण वीस लक्ष रुपये, प्रभाग १२ - खंडोबा मंदिर सभागृह बांधकाम करणे दहा लाख रुपये, पाणीपुरवठा योजनेच्या स्वयं हिस्सा भरण्याकरिता चाळीस लक्ष रुपये, प्रभाग १ - बंडू पतंगे ते राघू काळे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता आणि नाली बांधकाम करणे वीस लक्ष रुपये, प्रभाग ८ - बापू गिरी ते बापू हाके यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे वीस लक्ष रुपये, प्रभाग १० - पंडित माने यांचे घर ते अंगणवाडी पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे वीस लक्ष रुपये, प्रभाग १२ - बसवेश्रवर चौक ते खंडोबा मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता आणि नाली बांधकाम करणे पन्नास लक्ष रुपये, प्रभाग २ - हनुमंतवाडी पाटी वस्ती येथे सिमेंट रोड व नाली बांधकाम करणे वीस लक्ष रुपये असे एकूण पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

रेणापूर नगरपंचायत अंतर्गत विकास कामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार साहेब जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांचे तसेच सदरील निधी मिळावा यासाठी वेळोवेळी प्रयत्न केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचे रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, चंद्रकांत कातळे, उत्तम चव्हाण, दत्ता सरवदे, उज्वल कांबळे, अंतराम चव्हाण, राजू आलापुरे, हणमंत भालेराव, लखन आवळे, आजिम शेख, गणेश चव्हाण, मारूफ आत्तार, अच्युत कातळे, महादू राठोड, नितीन आढळकर, राजू धर्माधिकारी, महेश गाडे, मकसूद शेख, जगन्नाथ कातळे, सचिन सिरसकर, रमेश चव्हाण, योगेश राठोड, संतोष राठोड, शरद चक्रे, हरिभाऊ पांचाळ, धम्मानंद घोडके, उमाकांत कांबळे, गणेश माळेगावकर, रमेश वरवटे, सुरज फुलारी, रफिक कुरेशी, पप्पू कूडके, सोपान सातपुते, रफिक शिकलकर , आवेज कुरेशी यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या वतीने जाहीर आभार व्यक्त केले आहेत.

DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER-**SHAIKH TAJODDIN NIZAMODDIN TO : SHAIKH TAJODIN NIJAMODIN** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SHAIKH TAJODIN NIJAMODIN** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/CHILDREN AND RELATIVE

OLD NAME - SHAIKH TAJODDIN NIZAMODDIN
NEW NAME - SHAIKH TAJODIN NIJAMODIN
ADDRESS - KHADAKPURA GALLI
TQ-AUSA DIST-LATUR (413520)

जावक क्रमांक २०३०/२०२३
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर, २ रा मजला, दिवाणजी कॉम्पलेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर.
०१/०८/२०२३

चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर. एन. क्रमांक LTR/02754/18/23
फेरफार अहवाल/ अर्ज क्रमांक :_____
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक एकता चॅरिटेबल ट्रस्ट, जवळगा, ता. देवणी, जि. लातूर बाबत
न्यासाचा पत्ता:- जवळगा, ता. देवणी, जि. लातूर, जवळगा, ता. देवणी, जि. लातूर, देवणी, लातूर, देवनी, जवळगा.
अर्जदार :- संभाजी गुरूनाथराव संगशेट

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर, हे वर नमुद केलेला अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

अ. क्र.	तपशील	अंदाजे मूल्य
१	MEMBER FEE PRESIDENT IN HAND	५०००.०० १०००.०० (अक्षरी रूपये सहा हजार मात्र फक्त)

(अ) जंगम मिळकत :- रोख रू. ६०००/- मात्र

स्थावर मिळकत (वर्णन)

अ. क्र.	शहर किंवा गाव	सी. एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र.	क्षेत्र	मूल्यांकन	मुदत/ कालावधी किंवा स्वरूप	अंदाजे मूल्य

(ब) स्थावर मिळकत :- रोख रू. मात्र
(अक्षरी रूपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१.०८.२०२३ रोजी दिली.

शिक्का

स्वाक्षरीत/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर

खड्ड्यांमध्ये विसावा घेत प्रभुराजची हटके गांधीगिरी

लातूर : लातूर शहरात जागोजागी रस्त्यावर वर्षानुवर्षे खड्डे निर्माण झालेले आहेत. त्या खड्डड्यांमध्ये पावसाळ्यातच नव्हे तर उन्हाळ्यात देखील पाणी साचून असते. शहरातील काही रहदारीच्या ठिकाणी असलेल्या खड्ड्यांमध्ये प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने विसावा घेत हातामध्ये फलक घेवून हटके गांधीगिरी केली आहे.

लातूर शहरात सर्वत्र ठिकाणी सावेवाडीतील पूर्ण रस्ता, बस डेपो बाजूस समांतर रोड, गांधी चौक पोस्ट ऑफिस ते अग्रसेन भवन बसस्थानक मागील परिसर असे अनेक ठिकाणी रस्त्याची अवस्था चाळणी झाली आहे. या रस्त्यांचा वापर बाहेरून येणारे व शहरातील जनता जास्त प्रमाणात करते. त्यात असलेले खड्डे त्रास दायक ठरत आहेत. याची दुरुस्ती उन्हाळ्यात करण्यात आली होती. मात्र हलक्या सरी कोसळल्याने पुन्हा या रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. हे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असून मनपाच्या या निष्काळजीपणाचा नाहक त्रास जनतेला सहन करावा लागत आहे.

जनता लाखो रुपयांच्या स्वरूपात मनपाकडे करभरणा करते. त्या बदल्यात जनतेला दर्जेदार रस्ते, व मुलभूत सोई सुविधा पुरविण्याची गरज असतानाही मनपा प्रशासन याकडे सपशेल दुर्लक्ष करत आहे. मनपाच्या या काराभारामुळे जनतेमध्ये रोष निर्माण होत आहे. मनपा प्रशासनाने तात्काळ या रस्त्यांची दुरूस्ती करावी या मागणीसाठी प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये विसावा घेत हटके आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी ॲड. अजय कलशेट्टी, डॉ.संजय जमदाडे, यु. एस. मशायाक, एम. एम. पाटील, हुसेन पठाण, पारस चापसी, सचिन गोलावार, तुषार इंगळे, युवराज बेल्लूरे, शिरीष माळी, दत्ता गायकवाड, मोतीराम कदम,हरीश चेटवानी अशोक पंचाक्षरी,विलास भूमकर, मुन्ना बट्टेवार, सुरेश कोटलवार, शिवा रोडे, सोमनाथ खुदासे, पारस चापसी, गोपाळ खंडागळे आदी उपस्थीत होते.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९

SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते